# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 49) 1st November 2024 ( No. of Pages 08 ) ( No : 15


# जगदीश प्रसाद शर्मा विरुद्ध बिहार राज्य या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा उच्च शिक्षण विभागाकडून होत असलेल्या दुरुपयोगाबाबत सावध राहण्याची आवश्यकता


- **प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


**१.** विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स हे बंधनकारक आहेत असा मा.सर्वोच्च न्यायालयाने गंभीरधन गढवी प्रकरणात निर्णय दिला. "**राज्यशासनाचा कायदा किंवा शासननिर्णय यापेक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स यांचा दर्जा वरिष्ठ असून रेग्युलेशन्सच्या विरोधात असलेल्या राज्याच्या कायद्यातील किंवा शासननिर्णयातील तरतुदी विसंगतीच्या प्रमाणात निष्प्रभ होतील**" असा मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. राज्यशासनाने हा निर्णय मान्य केलेला असून त्याप्रमाणे विद्यापीठ कायद्यामध्ये बदलही केलेला आहे. मात्र उच्च शिक्षण विभागातील काही अधिकारी सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय मानायला तयार नाहीत व शासननिर्णयातील रेग्युलेशनशी विसंगत तरतुदी दुरुस्त करायला तयार नाहीत.

**२.** या संबंध प्रकरणामध्ये उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी **जगदीश प्रसाद शर्मा विरुद्ध बिहार राज्य** या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७ जुलै २०१३ रोजी दिलेल्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून ढाल म्हणून वापरणे सुरू केलेले आहे. विद्यापीठामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनच्या बाजूने काही निर्णय होत असेल तर तेथे, तसेच मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या काही प्रकरणात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी ही भूमिका घेतलेली आहे. सर्व उदाहरणे द्यायची आवश्यकता नसली तरी कागदोपत्री नमूद असलेले एक प्रकरण याबाबतीत उधृत करणे आवश्यक वाटते.

**३.** नुटाचे अध्यक्ष व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सरकार्यवाह प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी दिनांक ६ जून २०२३ रोजी झालेल्या अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये विषय क्रमांक ४६ अन्वये "**विद्यापीठ उपविधानातील भारतीय संविधानाशी विसंगत असलेल्या तरतुदी विलुप्त करण्याबाबत**" या विषयावर एक ठराव मांडला होता व हा ठराव परिनियम समितीकडे पाठवावा व विद्यापीठाने निर्गमित केलेले सन २०१९ चे निदेश क्रमांक ८ हे मागे घेण्यात यावेत अशी विनंती या ठरावान्वये करण्यात आलेली होती. **व्यवस्थापन परिषदेमध्ये हा ठराव बहुमताने मान्य करण्यात आला.** मात्र तत्कालीन कार्यवाहक कुलगुरुंनी या ठरावाच्या विरोधात भूमिका घेतली व मतभेदाचा मुद्दा झाल्यामुळे विद्यापीठ कायद्याच्या कलम १२(६) अन्वये मा.कुलपतींनी याबाबतीत अंतिम निर्णय घ्यावा अशी विनंती करून प्रकरण मा.कुलपतींकडे पाठविले.

**४.** राज्याच्या मा.कुलपतींनी हा ठराव राज्यशासनाच्या प्रधान सचिवांकडे पाठविला व राज्यशासनाचे याबाबतीत काय मत आहे ते कळवावे अशी विनंती त्यांना केली होती. उच्च शिक्षण विभागातील एका उप सचिवांनी दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी उच्च शिक्षण विभागाचे अभिप्राय मा.कुलपतींना कळविले. त्याबाबतचा मा.कुलपतींच्या पत्रातील उल्लेख पुढीलप्रमाणे:-

"3. The Deputy Secretary (H&TED) has referred about the observations of Hon'ble Supreme Court in the order dated 17.07.2013 issued in Civil Appeal No. 5527-5543 of 2013, **Jagdish Prasad Sharma Vs State of Bihar & others. -** There being no compulsion to accept and/or adopt the said scheme, the States are free to decide as to whether the Schemes would be adopted by them or not. In our view, there can be no automatic application of the recommendations made by the Commission, without any conscious decision being taken by the State in this regard,"

**५.** जगदीश प्रसाद शर्मा प्रकरणातील हा निर्णय चुकीच्या पद्धतीने विद्यापीठात व उच्च न्यायालयातील निरनिराळ्या प्रकरणात उच्च शिक्षण विभागातील अधिकारी वापरत आहेत असे आढळून आलेले आहे. त्यामुळे याबाबतीत सावध राहण्याची गरज आहे व त्याबाबतची घटनात्मक स्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यामधून तात्पुरत्या स्वरूपात का होईना, विपरित निर्णय पदरी पडू शकतात. हे करीत असतांना (i) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सची बंधनकारकता व घटनात्मक तरतुदी (ii) जगदीश प्रसाद शर्मा प्रकरणातील निर्णय याबाबतची तपशीलवार माहिती करून घेणे आवश्यक झालेले आहे.

**६.** भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टामध्ये केंद्रसूचीतील ६६ व्या क्रमांकावर "Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions" हा विषय आहे. हा विषय पूर्णपणे केंद्रसरकारच्या अखत्यारित असला तरी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता व त्यामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाचा कायदा करण्यात आला. याबाबतचे विधेयक संसदेमध्ये सादर करण्यात आले. तत्कालीन शिक्षणमंत्री श्री.मौलाना आझाद यांनी दिनांक २४ सप्टेंबर १९५४ रोजी जे Statement of object and reasons सादर केले त्यामध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. :-

"The Constitution of India vests Parliament with **exclusive authority in regard to coordination and determination of the standard in institution for higher education** or research and scientific and technical institutions. It is obvious that neither coordination nor determination of standards is possible unless the central government has some voice in the determination of standards of teaching and examination in universities, both old and new."

**७.** यूजीसी ॲक्ट १९५६ हा कायदा दिनांक ५ नोव्हेंबर १९५६ या दिवशी अस्तित्वात आला व त्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्याच्या कलम २६ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाला रेग्युलेशन्स करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. देण्यात आलेल्या या अधिकाराचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येते की, काही बाबतीत '**शिफारशींच्या स्वरूपाचे**' (Recommendatory) व काही बाबतीत '**बंधनकारक स्वरूपाचे**' (Mandatory) रेग्युलेशन्स निर्गमित करण्याचा अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाकडे आहे. एका बाजूला विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक म्हणून '**सेवेत येण्यासाठीची पात्रता**' व दुसऱ्या बाजूला '**वेतन विषयक व इतर सर्व सेवाशर्ती**' ठरविण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९० पर्यंत कोणतेही रेग्युलेशन्स निर्गमित केले नाही. सर्वप्रथम विद्यापीठ अनुदान आयोगाने फक्त पात्रतेविषयीचे रेग्युलेशन दिनांक १९ सप्टेंबर १९९१ रोजी निर्गमित केले. त्या रेग्युलेशनच्या सुरुवातीलाच कोणत्या शक्तींचा वापर करून आपण हे रेग्युलेशन निर्गमित केलेले आहे याबाबतचा उल्लेख केलेला आहे. तो पुढीलप्रमाणे:-

"In exercise of the powers conferred by **clause (e) of Sub section (1) of section 26....."**

८. या रेग्युलेशनने नेट-सेटची पात्रता लागू करण्यात आलेली होती. याबाबतीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका अशी होती की, हे रेग्युलेशन शिफारशीच्या स्वरूपाचे असल्यामुळे व महाराष्ट्रामध्ये त्याची कायदेशीररित्या अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्यामुळे ते बंधनकारक नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनच्या बाबतीत दिल्ली विद्यापीठ विरुद्ध राज सिंग (AIR 1995 Supreme Court 336) या प्रकरणामध्ये सन १९९४ मध्ये जो निर्णय दिला त्यामध्ये पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात आलेला आहे.:-

**"21. We now turn to analyse the said Regulations, .....**The first proviso to Cl.2 permits relaxation in the prescribed qualifications by a University provided it is made with the prior approval of the U.G.C. This is because the said Regulations, made under the provisions of S. 26(1) (e), define the qualifications that are ordinarily and not invariably required of a lecturer..... **The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.....** Yet again, it would be open to the University not to comply with the provisions of clause 2, in which case, in the event that it failed to satisfy the U.G.C. that it had 'done so for good cause, it would lose its grant

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
## NAGPUR BENCH : NAGPUR
## WRIT PETITION NO. 4618/2021

Nagpur University Teachers Association & others

**...VERSUS...**

The UGC, New Delhi & others

Mr. F.T. Mirza, Sr. Advocate for the Petitioner(s) Ms. S.S. Jachak, Addl. G.P. for the Respondent/State

**CORAM**

**AVINASH G. GHAROTE & SMT. M.S. JAWALKAR, JJ.**

**OCTOBER 17, 2024**

(1) The Petition questions Clause 12 (Page 964) of the Government Resolution dated 08/03/2019 (Page 917) dealing with the revision of pay-scales of the teachers in Non-Agricultural Universities, National Law University, Affiliated Colleges, Government Colleges/Institutes as per 7th Central Pay Commission (CPC) and UGC Regulations on minimum qualification for appointment of teachers and other academic staff in the Universities and Colleges and measures for the maintenance of standards in Higher Education, 2018 on the ground that Clause 12 is contrary to what has been stated in the communication dated 02/11/2017 issued by the Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Higher Education, in respect of the scheme of revision of pay of the teachers and equivalent cadres in the Universities and Colleges following the revision of pay-scale of the Central Government Employees on the recommendation of 7th CPC, inasmuch as Clause 16(iv) therein (Page 754) which contemplates the scheme to be extended to the Universities, Colleges and other Higher Educational Institutions coming under the purview of the State Legislatures, provided the State Governments wish to adopt and implement the scheme, subject to conditions (a) and (h) [relevant] of which condition (a) provides sharing of the financial burden in equal proportion of 50-50 and **condition (h) states that the payment of central assistance for implementation of the scheme is subject to the condition that the entire scheme of revision of pay-scale, together with all the conditions to be laid down by the UGC, by way of regulations and other guidelines, shall be implemented by the State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme 'without any modification'** except in regard to the date of implementation and pay-scale mentioned in the said communication.

(2) The Regulations referred to is dated 18/07/2018 (Page 859), in which clause 19.1 speaks about the incentives to be granted to Employees having acquired higher qualifications as indicated therein to the extent of grant of number of non-compounded advance increments as stated in clause 19.1 (i) to (v) (Page 901).

(3) **It is thus contended that though the State Government, in the Cabinet Decision dated 05/03/2019 (Page 917), has adopted the scheme of revision, however, has modified the grant of incentives, as indicated in Clause 19.1 (i) to (v) in the UGC Regulations dated18/07/2018 to the effect** that such incentives would not be permissible as the incentive structures are in-built in the pay structure itself, wherein those having Ph.d/M.Phil/PG degree in professional courses would progress faster under the Career Advancement scheme (CAS).

(4) **It is thus contended by Mr. Mirza, learned Senior Counsel appearing for the Petitioners that once the State Government took a decision to implement the pay revision vis-a-vis 7th CPC, along with the UGC Regulations dated 18/07/2018 (Page 859), it had to do it in its entirety and no modification,** as is now made on account of Clause 12 of the GR dated 08/03/2019, is permissible and the same is, therefore, liable to be quashed and set aside to that extent. Any modification, according to him, would disentitle the State from 50% financial assistance, from the Central Government in terms of the Clause 16(iv)(h) (Page 755) of the communication dated 02/11/2017 (Page 749).

(5) Learned AGP, while opposing the said contention, contends that there is no modification of Clause 19 (Page 901) of the UGC Regulations dated 18/07/2018 (Page 859), inasmuch as, what Clause 12 of the State GR dated 08/03/2019 (Page 964) contemplates is that, the incentives as provided in Clause 19 (supra) are in-built in the pay structure for the State Government Employees. In order to demonstrate this, the learned AGP is directed to place on record a comparative table regarding the incentives in Clause 19 (Page 901) of the UGC Regulations dated 18/07/2018 and the incentives structure in the CAS.

(6) List the matter on 19/10/2024.

**(SMT.M.S.JAWALKAR, J.) (AVINASH G.GHAROTE, J.)**

from the U.G.C..... There is, therefore, no element of selection in the process. The University's autonomy is not entrenched' upon by the said Regulations."

**९.** वेतन व्यवस्था व इतर सेवाशर्ती याबाबतीत रेग्युलेशन्स निर्गमित करण्यात आलेले नव्हते, पण पात्रतेसाठीचे हे रेग्युलेशन सुद्धा शिफारशीच्या स्वरूपाचे होते. पुढे एप्रिल २००० मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेटची पात्रता सेवेत भरती होतांना बंधनकारक करणारे रेग्युलेशन निर्गमित केले. त्याच्या शक्तिप्रदानतेबाबतचा उल्लेख पुढीलप्रमाणे आहे :-

"In exercise of the powers conferred by **clause (e) & (g) of sub-section (1) of Section 26......"**

विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम २६ उपकलम १ मधील परिच्छेद (e) चा वापर करून तुम्ही काढलेले रेग्युलेशन हे शिफारशीच्या स्वरूपाचे आहे असा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. आता एप्रिल २००० मध्ये त्याच उपकलमाच्या परिच्छेद (e) आणि (g) चा वापर करून बंधनकारक रेग्युलेशन काढण्यात आले. त्या रेग्युलेशनच्या बंधनकारकतेबाबत कोणताही वाद झाला नाही.

**१०.** सन २००० पासून नेट-सेटची पात्रता या रेग्युलेशनमुळे बंधनकारक झाली. वेतन व्यवस्था व सेवाशर्ती याबाबतीत पहिल्या वेतन आयोगापासून तर सहाव्या वेतन आयोगापर्यंत विनंती वजा पत्राच्या मार्फत केंद्रशासनाकडून वेतन पूनर्रचना केली जात होती आणि त्यामुळेच ती बंधनकारक नव्हती. सहाव्या वेतन आयोगाच्या वेळेला अशी वेतन व्यवस्था दिनांक ३१ डिसेंबर २००८ रोजीच्या एका केंद्रशासनाच्या परिपत्रकाद्वारे राज्यांकडे पाठविण्यात आली. स्वाभाविकपणे कायद्याच्या दृष्टिकोनातून या परिपत्रकाला सक्तीचे स्वरूप नव्हते व त्यामुळे बंधनकारकता नव्हती.

**११.** जगदीश प्रसाद शर्मा प्रकरणातील मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा दिनांक ३१ डिसेंबर २००८ रोजीच्या परिपत्रकान्वये पाठविण्यात आलेल्या केंद्रशासनाच्या वेतन पूनर्रचनेच्या योजनेबाबतचा आहे. मुख्यत्वे करून हा निर्णय सेवानिवृत्ती वयाबाबतचा आहे. सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्याची अट त्या योजनेमध्ये होती. अनेक राज्यांमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय व या शिक्षकांचे निवृत्तीचे वय यामध्ये दिसणाऱ्या फरकापोटी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतन पुनर्रचनेची व्यवस्था अनेक राज्यात लागू झालेली नव्हती. परिणामी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने ही अट मूळ योजनेतून वगळण्यात यावी अशी मागणी केली व त्याप्रमाणे केंद्रशासनाने वयाची अट मूळ योजनेतून वगळली (delink) होती. त्यामुळेच पुढे ती अट २०१० च्या रेग्युलेशनमध्ये सुद्धा समाविष्ट झाली नाही. मुख्यत्वे सेवानिवृत्तीच्या वयावर हा जगदीश प्रसाद शर्मा प्रकरणातील निर्णय आधारित आहे. या निर्णयामध्ये प्रत्यक्ष सुनावणी झाली त्यावेळेपर्यंत २०१० चे वेतन व्यवस्था व सेवाशर्ती बाबतचे रेग्युलेशन निर्गमित झालेले होते. त्यामुळे या निर्णयामध्ये रेग्युलेशन बाबतचा धावता उल्लेखसुद्धा आहे.

**१२.** जगदीश प्रसाद शर्मा विरुद्ध बिहार राज्य या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयात झालेला निर्णय पाहिला तर त्यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाला कोणत्याही अटी लादण्याचा अधिकार नाही या राज्यशासनाच्या म्हणण्याला कोणताही आधार नाही असे या निर्णयात मा.सर्वोच्च न्यायालयाने परिच्छेद ७० मध्ये स्पष्ट शब्दात पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे. :-

"The concern of the State Governments and their authorities that UGC has no authority to impose any conditions with regard to its educational institutions is clearly unfounded."

**१३.** रेग्युलेशनवर आधारित विद्यापीठ अनुदान आयोगाची योजना अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतला असेल तर योजनेतील सर्व अटींचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी ही आपोआपच राज्यशासनावर येते. असा स्पष्ट निष्कर्ष मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयात परिच्छेद ७९ मध्ये नोंदलेला आहे. तो पुढील शब्दात :-

"79. However, within this class of institutions there is a separate group where the State Governments themselves have taken a decision to adopt the Scheme. In such cases, the consequences envisaged in the Scheme itself would automatically follow."

**१४.** महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळासमोर केंद्राची सारी कागदपत्रे ठेवण्यात आलीत. दिनांक ५ मार्च २०१९ रोजी राज्य मंत्रीमंडळाने बैठक क्रमांक २१५ मध्ये या विषयावर घेतलेला निर्णय तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यालयातील जनसंपर्क कक्षाने अधिकृतपणे त्याच दिवशी जाहीर केला. तो शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे."**

**१५. एका बाजूला समग्र योजनेतील अटीशर्तींची मोडतोड करून व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात न केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळवून उच्च शिक्षण विभागातील या अधिकाऱ्यांनी भारताच्या मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रीमंडळाची घोर फसवणूक करण्याचे अपकृत्य केलेले आहे.**

**१६.** गेल्या काही वर्षात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची हिंमत इतकी वाढली की, देशाच्या मा. राष्ट्रपतींची व केंद्रशासनाची व राज्यमंत्रिमंडळाची फसवणूक करण्याचा प्रकार सुद्धा यातून घडला असे स्पष्टपणे दिसून येते. तो प्रकार पुढीलप्रमाणे :- केंद्रशासनाच्या मानव संसाधन विभागाने दिनांक २६ सप्टेंबर २०१९ रोजी "Reimbursement of central share for implementation of the scheme of revision of pay scales (7th CPC) of university and college teachers to the Govt. of Maharashtra-reg." या विषयावर एक शासकीय अधिसूचना (F.No.1-7/2019-U.II) निर्गमित केली ***(यापुढे उल्लेख केंद्रशासनाची अधिसूचना असा)*** असून या अधिसूचनेतील परिच्छेद ३ पुढीलप्रमाणे आहे:-

**"3. The sanction of the President is hereby accorded to the payment of Rs.1320,93,04,503/- (Rupees Thirteen**

---

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE**
**AT BOMBAY**
NAGPUR BENCH AT NAGPUR

## WRIT PETITION NO. 4618 OF 2021

Nagpur University Teachers Association, Thr. President, Pravin Balisingh Raghuwanshi And Ors. **...vs...** The University Grants Commission (Ugc), New Delhi Thr. Its. Secretary And Ors.

*Shri Firdos Mirza, Senior Advocate a/b. Shri A.I.Sheikh, Advocate for petitioners. Ms. S.S.Jachak, Addl. G.P. for respondents/ State. Shri V.B.Bhise, Advocate for respondent no. 1.*

**CORAM**
**AVINASH G. GHAROTE AND**
**SMT. M.S.JAWALKAR, JJ.**

**DATED : 24th OCTOBER, 2024.**

The learned Addl. Government Pleader for respondents/State makes a statement, that the State is not receiving any funding from Central Govt. in terms of Clause 16(iv)(h) (Pg.755) of the communication dated 02/11/2017 (Pg.749) and whatever has been received, is only in respect of clearing the arrears from 01/01/2016 to 31/03/2019. **In view of the above statement, it would indicate, that the funds have been received in terms of aforesaid Clause, which in fact, in view of the above statement, would indicate the scheme is being applied.** The learned Addl. Government Pleader to place on record an affidavit in terms of what has been stated above, as it is contended that, the State is not bound by the aforesaid Clause.

2. List the matter on 21/11/2024.

**(AVINASH G.GHAROTE, J.)**
**(SMT.M.S.JAWALKAR, J.)**

**Hundred Twenty Crore Ninety Three Lakh Four Thousand Five Hundred Three only)** to State Government of Maharashtra to enable it to meet additional expenditure involved in implementation of the Scheme during the period from 01.01.2016 to 31.03.2019. **This amount would be utilized by the State Govt. in accordance with the terms and conditions stipulated in this Department's letter referred to above."**

**१७. रुपये १३२० कोटी ९३ लक्ष एवढा निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यास भारताच्या मा. राष्ट्रपतींनी मान्यता दिली. त्याप्रमाणे तो निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यात आला. केंद्रशासनाच्या पत्रात नमूद असलेल्या अटी व शर्तीनुसारच वापर केला जाईल या अटीवर हा निधी मंजूर करण्यात आला आहे,** असेही या अधिसूचनेत स्पष्टपणे नमूद आहे. घटनाशास्त्राच्या प्रत्येकच विद्यार्थ्याला याची कल्पना असते की, केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता देऊन प्रस्ताव पाठविल्यानंतरच भारताचे मा.राष्ट्रपती त्यावर शिक्कामोर्तब करतात. केंद्रीय मंत्रीमंडळाने या रकमेला मान्यता दिलेली आहे. अशी मान्यता दिली असल्याबाबतचा स्पष्ट उल्लेख २६ सप्टेंबर २०१९ च्या केंद्रशासनाच्या या अधिसूचनेच्या परिच्छेद १ मध्ये आहे. तो पुढील शब्दात:-

"The Central Government had decided to provide financial assistance to State Governments opting to revise pay scales of teachers and other equivalent cadre, as per above said letters

## *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्रमांक १९ अन्वये झालेला निर्णय*

**१.** दिनांक ७ जुलै २०२४ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने उच्च शिक्षण विभागाच्या घटनाबाह्य वर्तनाच्या विरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाच्या परिच्छेद सात मध्ये आंदोलनाचे निरनिराळे ९ उपपरिच्छेद नमूद आहेत. त्याप्रमाणे घटक संघटनांनी पत्रकार परिषदांचे आयोजन, जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन, विद्यापीठांवरील मोर्चाचे आयोजन यशस्वीपणे पार पाडले. त्याचबरोबर विद्यापीठ परीक्षांच्या कामाशी सहकार्य न करण्याचा निर्णय घेण्यात आला होता व त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे. **परिच्छेद सातच्या उपपरिच्छेद ८ मध्ये कामबंद आंदोलन घोषित करण्याचा निर्णयसुद्धा घेण्यात आला होता. पुढे येऊ घातलेल्या आचारसंहितेचा विचार करता असा निर्णय घेण्यात येत आहे की, बेमुदत कामबंद आंदोलन सोमवार, दिनांक २ डिसेंबर २०२४ पासून सुरू करण्यात येईल.**

**२.** जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भात यापूर्वीच महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन योजना संघटनेच्या नेतृत्त्वाखाली याबाबतचा प्रवास बराच पुढे गेलेला आहे. या संघटनेच्या वतीने दिनांक १५ सप्टेंबर २०२४ रोजी राज्यस्तरीय पेन्शन महाअधिवेशन शिर्डी येथे आयोजित करण्यात आले होते. या संघटनेच्या वतीने Vote for OPS चा निर्णय घेण्यात आला असून त्या संघटनेच्या या निर्णयाला हे कार्यकारी मंडळ ठामपणे पाठिंबा देत असून त्यात सक्रियपणे सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. तालुकानिहाय सभांमध्ये या विषयाशी संबंधित सर्व संघटना तसेच शिक्षक-कर्मचारी यांना सहभागी व समभागी करून घेण्यात यावे असाही निर्णय घेण्यात येत आहे.

**३.** आंदोलनाच्या बाबतीत प्रचार साहित्य म्हणून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने दोन विशेषांक प्रकाशित करण्यात यावे असे ठरविण्यात येत आहे.

**(अ)** "**उच्च शिक्षण विभागाच्या भारतीय संविधान विरोधी वर्तनाचा निषेध विशेषांक**" हा पहिला विशेषांक असेल. या विशेषांकामध्ये **(i)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा दिनांक ७ जुलै २०२४ रोजीचा ठराव **(ii)** मा.मुख्यमंत्र्यांना दिनांक २४ जून २०२४ रोजी दिलेले पत्र **(iii)** वेगवेगळ्या बाबतीत मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना व घटनेतील तरतुदींचा भंग उच्च शिक्षण विभागाने केल्याबाबतची तपशीलवार माहिती समाविष्ट असेल.

**(ब)** "**जुनी पेन्शन योजना विशेषांक**" हा दुसरा विशेषांक असेल. या विशेषांकामध्ये **(i)** गेल्या दोन वर्षात जुन्या पेन्शन योजनेच्या समर्थनार्थ नुटा बुलेटीनमध्ये वेगवेगळ्या वेळी प्रकाशित झालेले १९४ परिच्छेद एकत्रितरीत्या समाविष्ट करण्यात यावेत. त्याशिवाय **(ii)** "जुनी पेन्शन योजना संघटनेने" घेतलेल्या Vote for OPS या निर्णयाला ठामपणे अंमलात आणण्याचा निर्णय या कार्यकारी मंडळाने घेतला असून त्याबाबतच्या विविध राजकीय पक्षांच्या भूमिका व संघटनेने घेतलेला Vote for OPS चा निर्णय याबाबतची तपशीलवार माहिती समाविष्ट असावी. **(iii)** शिवाय सेवानिवृत्तीवेतन व्यवस्थेबाबत संविधानामध्ये असलेल्या तरतुदी, ढोबळमानाने याबाबत केंद्रातर्फे व राज्यातर्फे करण्यात आलेली निवेदने, तसेच केंद्रशासनाने व राज्यशासनाने याबाबत काढलेले "कायदेशीर दस्तऐवज" तसेच राज्यशासनाच्या वित्त विभागाने २०.०९.२०२४ रोजी काढलेल्या शासननिर्णयातील पोकळपणा याबाबतची तपशीलवार माहिती या अंकात असावी.

**४.** या विशेषांकांच्या बाबतीत उपलब्ध असलेला वेळ लक्षात घेता असा निर्णय घेण्यात येत आहे की, हे दोनही विशेषांक महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयानुसार व महासंघातर्फे प्रकाशित करण्यात यावेत. याबाबतचा ठळक उल्लेख प्रथम पृष्ठावर असावा. वेगवेगळ्या घटक संघटनांनी आपआपल्या मुखपत्रांचे वेगवेगळे अंक मुद्रित करण्याची व्यवस्था या वेळेपुरती बाजूला ठेऊन नुटा या घटक संघटनेच्या मुखपत्राकडे ही जबाबदारी सोपविण्यात यावी असे ठरले. हे दोनही विशेषांक सर्व घटक संघटनांच्या वतीने काढण्यात आले असल्याचा स्पष्ट उल्लेख मुख्यपृष्ठावर असावा व सर्व प्रचारसभांमध्ये त्या अंकाचे वितरण करण्यात यावे. खर्चाचा अंदाज लक्षात घेता मूलतः महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ही जबाबदारी घ्यावी हे खरे असले तरी घटक संघटनांच्या त्या कामातील सहभागाचा विचार करून त्या अंकांचे मुद्रण व वितरण याबाबतीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेत.:-

**(i)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने दोनही विशेषांकाचे मुद्रण व घटक संघटनांना वितरण नुटा या घटक संघटनेने करावयाचे असल्यामुळे, घटक संघटनांच्या मागणीनुसार दोनही विशेषांकाच्या प्रती छापण्यात याव्यात. त्याबाबत लागणारा सर्व खर्च महाराष्ट्र प्राध्यापक महासंघातर्फे नुटा या घटक संघटनेला रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात येईल.

**(ii)** महासंघाच्या सर्व घटक संघटनांनी त्यांना लागणाऱ्या विशेषांकाच्या प्रतींच्या बाबतीत महासंघाच्या सचिवांना दिनांक २७ सप्टेंबर २०२४ पूर्वी कळवावे व त्याप्रमाणे खर्चास्तव घटक संघटनांतर्फे महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेकडे रेखांकित धनादेशाद्वारे देय रक्कम जमा करण्यात यावी असे ठरविण्यात आले.

**डॉ.एस.पी.लवांडे,** *अध्यक्ष* **डॉ.पी.बी.रघुवंशी,** *सरचिटणीस*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)

of this Department, by way of reimbursement, to the extent of 50% (fifty percent) of the additional expenditure involved in the implementation of the pay revision, for the universities, colleges and other higher educational institutions funded by the State Government, **for the period from 01.01.2016 to 31.03.2019, subject to fulfillment of prescribed terms and conditions."**

**१८.** राज्यशासनाने थकबाकी अदा केल्यानंतर ५० टक्के रकमेच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव विहित नमुन्यामध्ये केंद्रशासनाकडे सादर करावयाचा आहे, असेही या अधिसूचनेमध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"(c) The **proposal for reimbursement** on account of pay revision in State funded universities, colleges and other higher educational institutions shall be submitted in the prescribed format by the State Governments."

प्रतिपूर्ती ही (Reimbursement) प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची होत असते. मा.सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणात या शब्दाचा अर्थ ठरवून दिला आहे तो पुढीलप्रमाणे :-

"Reimbursement has to mean and imply restoration of an equivalent for something paid or expended. Reimbursement presupposes previous payment." - *Tata Iron & Steel Co. Ltd. V. Union of India, (2001) 2 SCC 41 (50) : 2000 (8) Supreme 73: 2000 (8) SCALE 3: JT 2000 (Supp-3) SC 428: AIR 2000 SC 3706: 2000. (Supp-5) SCR 228: 2000 (8) SLT 625: 2001 (1) SRJ 156.*

**न केलेल्या खर्चाची केंद्रशासनाकडून प्रतिपूर्ती मिळविणे हा फसवणुकीच्या स्वरूपाचा फौजदारी गुन्हा आहे. खरे म्हणजे गुन्हेगारी स्वरूपाच्या अशा कृत्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले पाहिजेत.**

**१९. केंद्रशासनातर्फे हे जे साहाय्य दिले जात आहे, हे केंद्राची संपूर्ण योजना (Entire Scheme) एक "समग्र योजना" (Composite Scheme) म्हणून कोणताही बदल न करता सर्व अटी व शर्तीसह व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्ससह राज्यशासनाला अंमलात आणावी लागेल या अटीवरच देण्यात येत आहे, असाही स्पष्ट उल्लेख केंद्रशासनाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद 4 च्या उपपरिच्छेद (h) मध्ये आहे.** तो पुढील शब्दातः-

"(h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition that the **entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification..."**

**२०.** दिनांक ३ मार्च २०२२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने गंभीरधन गढवी या प्रकरणातील निर्णय देतांना भारतीय संविधानातील कलम २५४ चा अर्थ लक्षात घेता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनशी विसंगत असलेल्या राज्यशासनाच्या कायद्यातील तरतुदी निष्प्रभ ठरतील असा स्पष्टपणे निर्णय दिला. महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी हा निर्णय मान्य करून सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १३ निर्गमित करून विद्यापीठ कायद्यातील रेग्युलेशनशी विसंगत तरतुदी दुरुस्त केल्या. पुढे राज्याच्या मंत्रिमंडळाने व विधिमंडळाने ही भूमिका मान्य केली व सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ मंजूर करून राज्याच्या कायद्यातील तरतुदी दुरुस्त केल्या. मा.राज्यपालांनी जो वटहुकूम काढला त्याला पुढे कायद्याचे स्वरूप देण्यात आले. त्या वटहुकुमाच्या उद्देशपत्रिकेखाली मा.राज्यपालांची स्वाक्षरी असून त्या खाली प्रधान सचिव उच्च शिक्षण यांची प्रतिस्वाक्षरी आहे. असे असतांना राज्यातील एखादा उपसचिव शासननिर्णयात रेग्युलेशनशी विसंगत तरतुदी असू शकतात अशी भूमिका कशी काय घेऊ शकतो? ती भूमिका पूर्णपणे घटनाबाह्य व बेकायदेशीर आहे. ही बाब लक्षात घेऊन घटक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या अधिवक्त्यांच्या मार्फत योग्य त्या ठिकाणी ही बाब मा.न्यायालयाच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे.

*To increase the maximum limit of Retirement Gratuity/Death Gratuity from Rs.14 lakhs to Rs.20 lakhs.*

## GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT

Government Resolution No. : PEN- 2022/C.R.85/SER-4
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai- 400032.

**Date : 10.10.2024**

**Reference :** Government Resolution, Finance Department No.PEN-2019/C.R.58/SER-4, dated 01.03.2019.

**PREFACE**

Government of Maharashtra has fixed the maximum limit of retirement gratuity to Rs.14 lakhs for the employees who retired after 01.01.2016 and the maximum limit of death gratuity from 01.01.2016 has been fixed to Rs.14 lakhs.

**2.** As per the Central Government, the matter of increasing the maximum limit of retirement gratuity / death gratuity to pensioners / family pensioners in the state from Rs.14 lakh to Rs.20 lakh is under the consideration of the government.

**3.** In the meeting held on 04.09.2024 of all the concerned office bearers of the State Government Officers / Staff Association along with the Hon'ble Chief Minister, it has been agreed to raise the maximum limit of gratuity to Rs.20 lakh from 01.09.2024.

**GOVERNMENT RESOLUTION**

**Government has decided to raise the ceiling on the maximum amount of Retirement Gratuity and Death Gratuity from 14.00 lakhs to Rs.20.00 lakhs with effect from 01.09.2024.**

2. Government is pleased to direct that the above decision should mutatis mutandis apply with necessary changes to those pensioners of Recognized and Aided Educational Institutions, Non Agriculture Universities and affiliated Non-Governmental Colleges and Agricultural Universities, etc. to whom pension scheme is made applicable.

3. In exercise of the powers conferred by the proviso under Section 248 of Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samitis Act of 1961 (Maharashtra Act number Five of 1962) and of all other powers enabling it on that behalf, Government is further pleased to decide that above decision shall be applied to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

4. This Government Resolution is available on the website of Government of Maharashtra i.e. www.maharashtra.gov.in and its computer code number is 202410101303279205. This order has been signed digitally.

By order and in the name of Governor of Maharashtra

**(Manisha Y.Kamte)**
Deputy Secretary to Government.

*सातव्या वेतन आयोगानुसार दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत सेवानिवृत्त निवृत्तिवेतनधारकांना सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देण्याबाबत सुधारणा...*

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

शासन पूरकपत्र क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४ हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई-४०००३२

**दिनांक : ३१ जानेवारी २०२४**

**संदर्भ :** (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि. ०५.०२.२०२१

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि. १२.०७.२०२१

### प्रस्तावना

उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ जानेवारी २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये जे शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, आणि यापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तिवेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेला आहे, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देय करण्यात आला आहे. तसेच संदर्भाधीन क्र. २ येथील शासन पूरकपत्रान्वये सदर शासननिर्णयामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तथापि, दि. ०१.०१.२०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांनी सहाव्या वेतन आयोगानुसार अंशराशीकरणाचा लाभ घेतला आहे. तथापि, सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित अंशराशीकरणाचा लाभ मंजूर करण्याबाबतचा आदेश निर्गमित होण्यापूर्वी ज्यांचा मृत्यू झाला आहे अशा निवृत्तिवेतनधारकांना सुधारित अंशराशीकरणाच्या लाभ अनुज्ञेयतेबाबत काही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे संदर्भाधीन क्र. २ येथील पूरकपत्रामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

### पूरकपत्र

दि. ०१.०१.२०१६ ते दि. ३१.१२.२०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या ज्या निवृत्तिवेतनधारकांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ नुसार सहाव्या वेतन आयोगानुसार निश्चित होणाऱ्या निवृत्तिवेतनाप्रमाणे अंशराशीकरणाचा लाभ घेतला आहे. तथापि, संदर्भाधीन क्र. १ येथील शासननिर्णय निर्गमित होण्यापूर्वी ज्यांचा मृत्यू झाला आहे, अशा निवृत्तिवेतनधारकांच्या कुटुंबियांना सुधारित निवृत्तिवेतनावर अंशराशीकरणाचा लाभ अनुज्ञेय राहील.

२. उपरोक्त सूचनेच्या अनुषंगाने विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी उपरोक्त कालावधीत मृत पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाशी संपर्क साधून प्रकरणाची योग्य ती पडताळणी/छाननी करून सदर कार्यवाही शासन पूरकपत्राच्या दिनांकापासून सहा महिन्यामध्ये पूर्ण करावी.

३. ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तिवेतनधारक यांना वरील पूरकपत्र योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

५. सदर पूरक पत्रातील तरतुदी अखिल भारतीय सेवेतील निवृत्तिवेतनधारक/राजकीय निवृत्तिवेतनधारक/स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनधारक/शौर्यपदकभत्ता निवृत्तिवेतनधारक/जखम अथवा इजा निवृत्तिवेतनधारक यांना लागू होणार नाहीत.

६. सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२४०१३११५२३३१८३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(मनिषा यु.कामटे)**
शासनाचे उप सचिव

*उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना "Career Advancement Scheme (CAS)"लागू करण्याबाबत.*

## महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन निर्णय : आस्था २०२४/प्र.क्र.ई. ८५४०२९/विशि-१**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग : हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२

**दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२४**

**वाचा :** (१) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्रमांक, एसडब्ल्युसी-२०११/१७२ भाग-२/सामासु, दिनांक २२ सप्टेंबर, २०११

(२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६

(३) एम.एच.आर.डी, भारत सरकार यांचे पत्र क्रमांक १-७/२०१५-U.II (१), दिनांक २ नोव्हेंबर, २०१७

(४) एम.एच.आर.डी, भारत सरकार यांचे पत्र क्रमांक, शुद्धीपत्रक एफ.क्र. १-७/२०१५-U.II (१), दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७

(५) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्रमांक एफ.क्र.२३-४/२०१७ (पीएस), दिनांक ३१ जानेवारी, २०१८

(६) भारत सरकारचे असाधारण राजपत्र, भाग III–विभाग ४, दिनांक १८ जुलै, २०१८

(७) एम.एच.आर.डी., भारत सरकार यांचे पत्र क्रमांक १-४/२०१७-U.II, दिनांक २८ जानेवारी, २०१९

(८) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.५६/१८/विशि-१ दिनांक ८ मार्च, २०१९

(९) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.५६/१८/विशि-१ दिनांक १० मे, २०१९

(१०) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्रमांक एसएएस/शिक्षण/सकाम/शिक्षक कर्म/७ वा आयोग/फरक/२०२०-२१/का.५/९७८०, दि. ९ मार्च, २०२१

(११) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक सकाम-२०१९/प्र.क्र.८१/सामासु, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१

(१२) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक सकाम-२०२३/प्र.क्र.९९/सामासु, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४

(१३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२३०९/प्र.क्र.१२८/विशि-१ दिनांक ५ मार्च, २०२४

(१४) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२३०९/

# कायमस्वरूपी १० टक्के वेतन कपात लादणारी सुधारित निवृत्ती वेतन योजना : २

*Continued from Page 214 of 2024 NUTA Bulletin*

**३३.** "राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना तसेच केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तिवेतन योजना (UPS) लागू करण्याबाबत" या विषयावर महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी काढलेला शासननिर्णय म्हणजे शासननिर्णय कसा असू नये? याबाबतचे अत्यंत उत्तम उदाहरण म्हणून नमूद करता येईल. परस्पर विरोधी तरतुदींची रेलचेल, मोघम विधानांची नको तेवढी गर्दी, अनेक बाबतीत निर्णय घेतल्यासारखे दाखवून त्याविषयी निर्णयच न घेणे असे अनेक दोष या शासननिर्णयात आपल्याला दिसून येतील.

---

प्र.क्र.१२८/विशि-१ दिनांक २४ जून, २०२४

(१५) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्रमांक समाज कार्य/ प्रक्र.६७-३३२४/महाविद्यालय, दिनांक ६ सप्टेंबर, २०२४

### *प्रस्तावना*

राज्यातील समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना ७ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करण्यास, संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यता, "अध्यापकांच्या Career Advancement Scheme (CAS) बाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल," या अटीच्या मान्यतेने देण्यात आली होती. त्यामुळे उपरोक्त समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकीय पदांना अद्याप कॅस योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात आला नव्हता. संदर्भ क्रमांक १२ येथील शासन निर्णय, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ अन्वये "समाजकार्य महाविद्यालय (बी.एस.डब्ल्यू/एम.एस.डब्ल्यू अभ्यासक्रम)" हा विषय आता उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

०२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांमधील अध्यापकांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याचा शासन निर्णय दिनांक ०८.०३.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये अध्यापकांना लागू करावयाच्या Career Advancement Scheme (CAS) बाबतच्या तरतुदी अंतर्भूत आहेत. तद्नंतर, संदर्भीत शासन निर्णय दिनांक १० मे, २०१९, दिनांक ५ मार्च, २०२४ व दिनांक २४ जून, २०२४ नुसार वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदर Career Advancement Scheme (CAS) योजना अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकीय पदांना, दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंदर्भात मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

### *शासननिर्णय*

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांमधील अध्यापकांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याचा शासन निर्णय दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये अध्यापकांना लागू करावयाच्या Career Advancement Scheme (CAS) बाबतच्या तरतुदी अंतर्भूत आहेत. उपरोक्त शासन निर्णयातील Career Advancement Scheme संदर्भातील तरतुदी, विभागाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकीय पदांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून लागू करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेची कार्यपद्धती अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये यामधील अध्यापकांना लागू करण्यात आलेल्या कॅस योजनेप्रमाणे राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४१०१४१५२०१८०३०८ असा असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रताप पां. लुबाळ)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**३४.** परस्पर विरोधी विधाने या शासननिर्णयामध्ये अनेक ठिकाणी मुबलकपणे आपल्याला दिसून येतात. उदाहरण म्हणून द्यावयाचे झाल्यास या शासननिर्णयाच्या परिशिष्ट-अ मध्ये ८ व्या क्रमांकावर किमान निवृत्तिवेतनाबाबत पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

"८. या योजनेंतर्गत किमान १० वर्षांच्या सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यावर **किमान निवृत्तिवेतन रु. ७,५००/- इतके राहील.** १० वर्षापेक्षा कमी सेवा असल्यास या योजनेंतर्गत निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहणार नाही."

याच शासननिर्णयाच्या परिशिष्ट-ब मध्ये तिसऱ्या क्रमांकावर पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

"3. Assured **minimum pension: @10,000 per month** on superannuation after minimum 10 years of service."

**३५.** या शासननिर्णयाच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये दोन परस्पर विरोधी वाक्ये आहेत. त्यातील पहिले वाक्य पुढीलप्रमाणे आहे. :-

"राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना दिनांक ०१.०३.२०२४ पासून लागू करण्यात येत आहे. **(सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे)**"

त्या पुढचे दुसरे वाक्य पुढीलप्रमाणे आहे. :-

"त्याचबरोबर केंद्र सरकारने दि. २४.०८.२०२४ रोजी घोषित केलेली 'एकीकृत निवृत्तिवेतन योजना' (Unified Pension Scheme) शासकीय कर्मचाऱ्यांना जशीच्या तशी लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. **(सोबतच्या परिशिष्ट-ब प्रमाणे)**"

परिशिष्ट-अ प्रमाणे योजना लागू करण्यात येत आहे असे नमूद करतांना पुढच्याच वाक्यात केंद्राची योजना जशीच्या तशी परिशिष्ट-ब प्रमाणे लागू करण्यात येत आहे.

आता परिशिष्ट 'अ' मधील योजना परिशिष्ट 'ब' मधील योजनेसारखीच असेल तर मग दोन दोन परिशिष्टे समाविष्ट करण्याचे कारणच काय? व वेगळी असेल तर खरी कोणती? एकच परिशिष्ट न देता दोनही परिशिष्टे देणे म्हणजे कर्मचाऱ्यांना ज्यातील जे चांगले असेल ते आम्ही करणार आहोत त्यात काही चांगले नसेल तर ते आम्ही करणार नाही असे दाखवून कर्मचाऱ्यांची कशीतरी समजूत काढणे हा हेतू स्पष्टपणे दिसून येतो. असे करीत असतांना याच शासननिर्णयात असेही नमूद करण्यात आलेले आहे की, **"केंद्र शासनाच्या एकीकृत निवृत्तिवेतन योजनेमध्ये वेळोवेळी होणारे बदल किंवा त्यानुषंगाने घेतलेले निर्णय राज्याच्या सुधारीत निवृत्तिवेतन योजनेस आपोआप लागू होणार नाहीत."** म्हणजे पुढे कर्मचाऱ्यांना अनेक आंदोलने करावी लागतील याची पुर्वसूचना देण्याचे काम या शासननिर्णयाने केलेले आहे. वस्तुतः असे काम हे शासननिर्णयाने करावयाचे काम नसते.

**३६.** या शासननिर्णयातील महत्त्वाचा दोष असा आहे की, वापरण्यात आलेल्या शब्दांच्या व्याख्या देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे. निश्चित झालेल्या वेतनावर महागाई वाढ मिळेल किंवा नाही याबाबत **"त्यावरील महागाई वाढ मिळेल"** अशी शब्दरचना परिशिष्ट-अ मध्ये पहिल्याच परिच्छेदामध्ये वापरलेली आहे. पण ही महागाई वाढ निश्चित कशी असेल याची व्याख्या नमूद केलेली नाही. वस्तुतः All India Consumer Price Index for Industrial Workers (AICPI-IW) या निर्देशांकावर महागाई भत्ता आधारित असतो असे परिशिष्ट-ब च्या परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेले आहे ते पुढील शब्दात :-

"4. Inflation indexation: on assured pension, on assured family pension and assured minimum pension Dearness Relief based on All India Consumer Price Index for Industrial Workers (AICPI-IW) as in case of service employees"

परिशिष्ट-अ मध्ये मात्र "महागाई वाढ" असे मोघम शब्द वापरण्यात आलेले आहेत. केंद्राच्या योजनेत 'महागाई भत्ता' हा शब्द नुसता वापरला नसून त्याची व्याख्या केलेली आहे. राज्याच्या योजनेने 'महागाई भत्ता' हा शब्द मोघमपणे वापरला आहे.

**३७.** महागाई वाढ या शब्दाचा अर्थ निश्चित न करणे म्हणजे पुन्हा आंदोलने करण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर येणे होय. वस्तुतः औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक निर्देशांकावर आधारित वेळोवेळी वाढ करून केंद्रशासनातर्फे वर्षातून दोनदा महागाई भत्ता वाढविल्या जातो. ही वाढ प्रत्येक राज्यामध्ये लागू होतेच असे नाही. अनेक राज्यांमध्ये त्यासाठी कर्मचाऱ्यांना आंदोलने करावी लागतात. तसे ते सन १९७८ पूर्वी महाराष्ट्रामध्ये सुद्धा करावे लागत होते. मा.श्री.शरदचंद्र पवार प्रथम मुख्यमंत्री झाले असतांना **"केंद्रसरकारने महागाई भत्ता वाढविला की, त्याची राज्यातही अंमलबजावणी केली जाईल"** असा धोरणात्मक निर्णय झाला. त्याचा परिणाम असा झाला की, त्या विषयावर गेल्या ४०-५० वर्षात कर्मचाऱ्यांना आंदोलन करावे लागले नाही. आजचा सुधारित नवीन निवृत्तिवेतन योजनेचा शासननिर्णय पाहिला तर अनेक बाबींसाठी अनेक वेळा आंदोलने करावी लागतील. अशा बाबींची एक यादीच कर्मचाऱ्यांना तयार करावी लागेल.

**३८. "राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्वीकारावी"** हे तत्त्व मान्य करण्यात आल्याचे परिशिष्ट-अ च्या पहिल्याच परिच्छेदात नमूद आहे. जुन्या पेन्शन योजनेमध्ये १० टक्के वेतन कपातीची तरतूद कधीही नव्हती. नवीन पेन्शन योजनेत तीचा जन्म झाला. आता सुधारित नवीन पेन्शन योजनेमध्ये १० टक्केचा हा भुर्दंड कायमस्वरूपी बसविण्यात आला आहे. गुंतवणुकीवरील जोखीम स्वीकारण्यासाठी एक रुपयाची तरतूद या शासननिर्णयामध्ये कोठेही करण्यात आलेली नाही.

**३९.** सेवानिवृत्तीनंतर गुंतवणुकीतून येणारी रक्कम ही ५० टक्क्यांपेक्षा कमी असेल तर ती ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी शिग (Top-Up Amount) घालावी लागेल. याबाबतीत या शासननिर्णयामध्ये सर्वात मोठा गोंधळ आहे. त्याबाबतची कोणतीही जबाबदारी घेण्याची तरतूद करण्यास शासननिर्णयाने स्पष्टपणे नकार दिलेला आहे असे म्हणता येईल.

**४०.** केंद्रशासनाच्या योजनेमध्ये "कर्मचाऱ्यांकडून कपात करावयाच्या १० टक्के रकमेमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही." अशी स्पष्ट तरतूद आहे. ती पुढील शब्दात :-

"7. **The employee contribution shall remain un-altered at 10% of (basic pay + DA). The Government contribution will increase from the present 14% to 18.5%."**

केंद्रशासनाची वर्गणी १० टक्के वरून १४ टक्के करण्यात आली. ती आता १४ टक्केवरून १८.५ टक्के केली जाईल असे केंद्रशासनाच्या सुधारित वेतन योजनेमध्ये नमूद आहे. म्हणजे शिग घालावयाची रक्कम ही ४.५ टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही हे केंद्रशासनाने गृहीत धरलेले आहे. राज्याच्या शासननिर्णयामध्ये याबाबतीत कोणतीही तरतूद नाही. आंध्रप्रदेशच्या कायद्यामध्ये १० टक्के वर्गणीच्या सोबतच आणखी आंध्रप्रदेश सरकार बसविल तेवढी जादा रक्कम कर्मचाऱ्यांना वर्गणी म्हणून भरावी लागेल अशी स्पष्ट तरतूद आहे. ती पुढीलप्रमाणे :-

"(6) **"APGPS Subscriber"** means the employee, who registers to avail the benefits defined under the Andhra Pradesh Guaranteed Pension System;"

**४१.** आंध्रप्रदेशच्या कायद्याप्रमाणे सुधारित पेन्शन योजनेमध्ये पुन्हा 'वर्गणीदार' म्हणून स्वतःला नोंदवून घ्यावे लागेल. अशारीतीने दुहेरी वर्गणीदाराचा जीरेटोप सदरहू कर्मचाऱ्याच्या डोक्यावर चढविला जाईल. महाराष्ट्र शासनाच्या शासननिर्णयामध्ये याबाबतीत एका ओळीची सुद्धा तरतूद नाही. ही बाब पूर्णपणे मोघम ठेवलेली आहे. सारांश काय तर **"राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्वीकारावी हे समितीच्या शिफारशीतले तत्त्व मान्य राज्यशासनाने मान्य केलेले आहे."** हे परिशिष्ट-अ मधील वाक्य हा नुसता मन समजावण्याचा प्रकार आहे. ही जोखीम स्वीकारली आहे म्हणजे निश्चित काय केले आहे? त्यासाठी किती तरतूद केलेली आहे? याविषयीचा एका वाक्याचासुद्धा उल्लेख या संबंध शासननिर्णयामध्ये कोठेही नाही. एक रुपयाची तरतूद न करता ही जोखीम स्वीकारलेली आहे असे म्हणणे हे केवळ शब्दांचे बुडबुडे आहेत.

**४२.** सेवेची वर्षे मोजण्याबाबतीत सुद्धा परस्पर विरोधी तरतुदी या शासननिर्णयामध्ये दिसून येतात. उदाहरणार्थ परिशिष्ट-अ च्या परिच्छेद ५ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

"**५. कर्मचाऱ्याची २० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा झाली असल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% निवृत्तिवेतन अनुज्ञेय करण्यात येईल.**"

याच शासननिर्णयाच्या परिशिष्ट-ब च्या परिच्छेद १० मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

"10. **Full assured pension will be available for a minimum qualifying service of 25 years."**

प्रत्यक्षात २५ वर्षे की २० वर्षे असा प्रश्न उपस्थित होईल तेव्हा कर्मचाऱ्यांना आंदोलन करावे लागेल असा आदेशच या परस्पर विरोधी तरतुदीतून झिरपतो. शिवाय एक अधिकारी २५ वर्षे, तर दुसरा अधिकारी २० वर्षे मान्य करतो. यातून अधिकाऱ्यांना "अर्थपूर्ण चर्चा" करण्यासाठी मैदान मोकळे व्हावे हा हेतू झिरपतो ते वेगळेच.

**४३.** केंद्रशासनाने याबाबतीत दोन फंडाची स्थापना करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ही गोष्ट या शासननिर्णयाच्या परिशिष्ट-ब च्या परिच्छेद ७ मध्ये पुढील शब्दात नमूद आहे. :-

- an individual pension fund to which the employee contribution (10@% of basic pay and DA) and matching Government contribution will be credited.
- a separate pool corpus with additional Government contribution alone (8.5% of basic and DA of all employees).

पण राज्यशासनाने असा कोणताही फंड स्थापित करण्याचा निर्णय घेतल्याचे या शासननिर्णयातून दिसून येत नाही.

**४४.** जुन्या पेन्शन योजनेच्या बांधकामामध्ये कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर पुढच्या महिन्यापासून त्याला निवृत्तिवेतन सुरू होईल अशी अंगभूत व्यवस्था अस्तित्वात आहे. आता ही जी नवीन सुधारित पेन्शन योजना आलेली आहे त्यामध्ये याबाबतची व्यवस्था खुपच विलंबकारी व कर्मचाऱ्याला 'झटके' देणारी आहे. ती पुढीलप्रमाणे :-

"**ही योजना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अन्य पात्र कर्मचाऱ्यांना लागू असल्याने यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही पार पाडल्यावर तसेच राज्यशासकीय कर्मचाऱ्यांसमवेत अन्य कर्मचाऱ्यांसंदर्भाने सर्व यंत्रणा सुसज्ज झाल्यावर जे कर्मचारी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीमधून दि. ०१ मार्च २०२४ पूर्वी व नंतर सेवानिवृत्त झाले आहेत वा होणार आहेत अशा कर्मचाऱ्यांकडून राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत किंवा सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अंतर्गत लाभ मिळण्याबाबत आवश्यक तो विकल्प घेण्यात येईल. .... त्याचबरोबर Annuity Service Provider कडून प्राप्त होणारे ४०% वार्षिकीमधून प्राप्त होणारा परतावा शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेंतर्गत निवृत्तिवेतन अनुज्ञेय ठरेल. त्यासंदर्भाने या योजनेच्या अटी व शर्ती विहित करून त्यासंदर्भातील कार्यपद्धती PFRDA च्या मान्यतेच्या अधिन राहून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.**"

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 01.11.2024) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.11.2024**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,..........................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................